## विशेष दिवाणी दावा क्र. १०/२०१४ मध्ये निशाणी क्र.१०६ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे वादीला त्याचा अतिरिक्त पुरावा दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादीने निशाणी क्र. ६३ प्रमाणे दिनांक ०४/०३/२०१५ रोजी त्याचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यानंतर वादीचा प्रतिवादींतर्फे उलटतपास पूर्ण झालेला आहे. वादीचा उलटतपास सुरु असतांना वादींना दिनांक १४/०६/१९१५ रोजीचे आनंदराव उर्फ श्यामराव पाटील यांनी केलेले खरेदीखत व तसेच दिनांक १०/०२/१९१६ रोजीचे तारण गहाणखत व तसेच दिनांक २१/०८/१९१७ रोजीचा आनंदराव उर्फ श्यामराव पाटील यांनी लिहुण दिलेला चुक दुरुस्ती लेख या दस्तऐवजांच्या प्रमाणीत प्रती प्राप्त झाल्या आहेत. सदर दस्तऐवज वादीने दिनांक १९/०३/२०२० रोजी अभिलेखावर दाखल केले आहेत. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, त्या दस्तऐवजांना निशाणी क्रमांक देवून ते सिध्द करण्याकरीता वादीला अतिरिक्त पुरावा देणे आवश्यक आहे. वादीने प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, अर्जात नमूद केलेले कागदपत्र सिध्द करण्याकरीता वादीला त्याचा अतिरिक्त पुरावा दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

२) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशीत केले आहे. प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ तर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वादीने दिनांक ०४/०३/२०१५ रोजी त्याचा पुरावा दाखल केला आहे व तसेच वादीचा उलटतपास देखील पूर्ण झाला आहे. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये त्याचा अतिरिक्त पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता संयुक्तिक कारण नमूद केले नाही. प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये शेवटी अशी विनंती केली आहे की, वादीचा अर्ज नामंजूर करावा.

३) प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्या व्यतिरिक्त इतर प्रतिवादींनी प्रस्तुत

अर्जास त्यांचे म्हणणे दिले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्या व्यतिरिक्त इतर प्रतिवादींचे म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींतर्फे विद्वान वकील श्री. पी. पी. जोग व प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ तर्फे विद्वान वकील श्री. आर. डी. देशपांडे यांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्या व्यतिरिक्त इतर प्रतिवादींच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १८ ते २० व २३ यांच्या व्यतिरिक्त इतर प्रतिवादींचा युक्तिवाद नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

५) दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी वादी क्र. १ संदीप दिगांबर वास्कर यांनी निशाणी क्र. ६३ कडे त्यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यानंतर सदर वादी क्र. १ यांचा प्रतिवादींतर्फे उलटतपास पूर्ण झाला आहे.

६) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानूसार वादीचा उलटतपास सुरु असताना वादींना दिनांक १४/०६/१९१५ रोजीचे आनंदराव उर्फ श्यामराव पाटील यांनी केलेले खरेदीखत व तसेच दिनांक १०/०२/१९१६ रोजीचे तारण गहाणखत व तसेच दिनांक २१/०८/१९१७ रोजीचा आनंदराव उर्फ श्यामराव पाटील यांनी लिहुण दिलेला चुक दुरुस्ती लेख या दस्तऐवजांच्या प्रमाणीत प्रती प्राप्त झाल्या आहेत. सदर दस्तऐवज वादीने दिनांक १९/०३/२०२० रोजी अभिलेखावर दाखल केले आहेत. सदर कागदपत्र सिध्द करण्याकरीता वादीने त्याचा अतिरिक्त पुरावा दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. वादीने जे दस्त/खरेदीखत, गहाणखत व चुक दुरुस्तीचा लेख सिध्द करण्याकरीता त्याचा अतिरीक्त पुरावा दाखल

करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे त्या दस्तांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी हे सदर दस्तांमध्ये दस्त लिहून देणार किंवा लिहूण घेणार या पैकी कोणीही नाहीत. तसेच वादी हे सदर दस्तांवर साक्षीदार म्हणून देखील नाहीत. वादी हे सदर दस्तांचे जनक (author) नाहीत. त्यामुळे अशा परिस्थितीत वादींनी त्यांचा स्वतःचा साक्षपुरावा देवून सदर दस्त सिध्द करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते वादींनी प्रस्तुत अर्जात नमूद केलेले दस्त सिध्द करण्याकरीता त्याचा अतिरीक्त साक्षपुरावा दाखल करण्यास परवानगी देण्याची केलेली विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमूद करणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

स्वाक्षरी/–

(पां.लिं. घुले)

दिनांकः– २१/१०/२०२१

दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,

दारव्हा.